RNI No. MAHBIL /2009/31743

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-ब

वर्ष ९, अंक ४] गुरुवार ते बुधवार, मे २५-३१, २०२३/ ज्येष्ठ ४-१०, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २०.००

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## पर्यटन व सांस्कतिक कार्य विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ मे २०२३.

### अधिसूचना

**महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्र विषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६०.**

क्र.स्मारक-२०१८/प्र.क्र.५९/सां.का.३.— ज्याअर्थी, शासन अधिसूचना क्र. स्मारक-२०१८/प्र.क्र.५९/ सां.का.३, दिनांक १५ जून २०२१ याअन्वये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्र विषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२) या अधिनियमाच्या कलम ४ मधील पोट-कलम (१) अन्वये सोबत असलेल्या अनुसूचित निर्दिष्ट प्राचीन व ऐतिहासिक स्मारक संरक्षित स्मारक घोषित करण्याचा इरादा असल्याची दोन महिन्यांची नोटिस दिली होती ;

आणि ज्याअर्थी, असे स्मारक संरक्षित म्हणून घोषित करण्यासंबंधी शासनाकडे कोणत्याही हरकती आलेल्या नाहीत.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्र विषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२) या अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (३) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त प्राचीन व ऐतिहासिक स्मारक संरक्षित असल्याचे जाहिर करत आहे.

### अनुसूची

स्थान देवीहसोळ, तालुका राजापूर, जिल्हा रत्नागिरी

**सर्व्हे/गट क्र. ७४/३**

**स्मारकाचे नांव** : देवीहसोळ येथील कातळशिल्प समूह-१

**मालकी** : श्री. कृष्णा गोविंद सकपाळ व इतर.

**तपशील** : देवीहसोळ येथील हा कातळशिल्प मध्याश्मयुगीन काळातील असून या कातळशिल्प समूहात अगम्य आकृत्या दाखवण्यात आलेल्या आहेत.

कोकणातील प्रागैतिहासिक व विशेषत्वाने मध्याश्मयुगीन मानवाने निर्माण केलेली कलाकृती म्हणून या कातळशिल्पाला अनन्यसाधारण महत्व आहे.

| | | |
|---|---|---|
| **संरक्षित करावयाच्या स्मारकाचे क्षेत्रफळ** | : | ८.५ मी. × ८.५ मी. = क्षेत्रफळ ७२.२५ चौ. मी. |
| **संरक्षित करावयाच्या स्मारका भोवतालचे क्षेत्र** | : | खालील सर्व अंतरे कातळशिल्प समूह ज्या आयतात आहे त्या आयताच्या बाजूपासूनची आहेत.<br>**पूर्वेस** : १०.०० मी., **पश्चिम** : १०.०० मी.<br>**उत्तर** : १०.०० मी., **दक्षिण** : १०.०० मी.<br>संरक्षित करावयाच्या स्मारकाच्या सभोवतालचे एकूण क्षेत्र : २७०.०० चौ. मी. |
| **संरक्षित करावयाचे एकूण क्षेत्रफळ (स्मारकासह)** | : | एकूण संरक्षित करावयाचे क्षेत्रफळ : ३४२.२५ चौ.मी. |
| **संरक्षित करावयाच्या क्षेत्राच्या चतु:सिमा** | : | **पूर्व** : गट नं. ७४/३ पैकी<br>**पश्चिम** : गट नं. ७४/३ पैकी<br>**दक्षिण** : गट नं. ७४/३ पैकी<br>**उत्तर** : गट नं. ७४/३ पैकी |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

**विलास थोरात,**
शासनाचे उप सचिव.

## TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 4th May 2023.

*NOTIFICATION*

Maharashtra Ancient Monuments and Archaeological Sites and Remains Act, 1960.

No. Smarak 2018/C.R.59/Sanka-3.— Whereas, by the Government Notification No. Smarak 2018/C.R.59/Sanka-3, dated the 15th June 2021, the Government of Maharashtra had given two months notice of its intention to declare the ancient and historical monument specified in the schedule appended hereto to be a protected monument, as required by sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Ancient Monuments and Archaeological Sites and Remains Act, 1960 (Mah. XII of 1961) ;

And whereas the Government has not received any objection to the making of such a declaration. Now, therefore, in exercise of powers conferred by sub-section (*3*) of section 4 of the Maharashtra Ancient Monuments and Archaeological Sites and Remains Act, 1960 (Mah. XII of 1961), the Government of Maharashtra hereby declare the said ancient and historical monument as a protected monument.

*Schedule*

Locality Devihasol, Taluka Rajapur, District Ratnagiri

| | | |
|---|---|---|
| **Gat No. 74/3** | | |
| **Name of the monument to be protected** | : | Petroglyph No. 1 at Devihasol |
| **Ownership** | : | Krishna Govind Sakpal and others |
| **Particulars** | : | The petroglyphs at Devihasol can be dated to Mesolithic period. The petroglyph is depicted a figure that cannot be identified.<br>This group of petroglyphs in Konkan region has extraordinary importance as this is the creation of Mesolithic man. |
| **Area of the monument to be protected** | : | 08.50 m. × 08.50 m. = area 72.25 sq. metres |
| **Total Area around the monument to be protected** | : | *East :* 10.00 metres ; *West :* 10.00 metres<br>*North :* 10.00 metres ; *South :* 10.00 metres<br>Total area around the monument to be protected :- 27.00 Square metres. |
| **Total Area (including the monuments) to be protected** | : | Total area = 342.25 Square metres |
| **Boundaries** | : | *East :* Gat No. 74/3<br>*West :* Gat No. 74/3<br>*North :* Gat No. 74/3<br>*South :* Gat No. 74/3 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VILAS THORAT,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.